नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५५ Issue - 355 | वार सोमवार दि. १८ मे २०२६ Blow- Monday Date 18 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



# 'शक्तिपीठ माढा तालुक्यातून पालखी व पुणे-सोलापूर महामार्गाला समांतर, एक इंचही जमीन देणार नाही' ; राजू शेट्टींच्या नेतृत्वात शेतकऱ्यांचा रास्ता रोको

## ग्रामस्थांचा महामार्गास विरोध; आंदोलनाची धग कायम, कोल्हापुरात सर्वपक्षीय मेळाव्याची हाक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातून शक्तीपीठ महामार्ग हा पालखी महामार्ग व पुणे-सोलापूर महामार्गास समांतर आहे. शेतकऱ्यांचा या महामार्गास विरोध असून एक इंचही जमीन न देण्याचा संकल्प राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रास्ता रोकोच्या आंदोलनादरम्यान केला. माढा तालुक्यातून सर्वाधिक द्राक्ष, ऊस व डाळींब बागायती जमीनी यासाठी संपादित केल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांनी उजनी डाव्या कालव्यातून १० ते १२ किलोमीटर पाईपलाईन करून जमीनी बागायती केलेल्या आहेत. आज (१७ मे) स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली माढा तालुक्यातील अरण या गावी पुणे-सोलापूर महामार्ग रास्ता रोको करून बंद ठेवण्यात आला.

दरम्यान, शेतकऱ्यांनी महामार्ग रोखल्यानंतर पंधरा मिनीटांतच पोलिसांनी शेतकऱ्यांना महामार्गावरून अटकाव करण्याचा प्रयत्न केला. यावेळी राजू शेट्टी यांनी संतप्त होवून पोलिसांना चांगलेच धारेवर धरले. पोलिसांनी दडपशाही केल्यास राष्ट्रीय महामार्गावर बेमुदत बसण्याचा इशारा दिला. यानंतर पोलिसांनी सयंमाची भूमिका एक तास रास्ता रोको झाला.

संत सावता माळी यांची संजीवन समाधी असलेल्या गावात 'कांदा, मुळा, भाजी अवघी विठाई माझी' हा त्यांचा जगप्रसिद्ध अभंग याच अरण गावच्या मातीतील शेतामळ्यात रचला गेला. दरवर्षी आषाढी वारी झाल्यानंतर स्वतः विठ्ठलाची पालखी सावता महाराजांना भेटण्यासाठी पंढरपूरहून अरण गावी येते. याच गावातून शक्तीपीठ महामार्ग जात असल्याने व ६०० एकर जमीन यासाठी संपादित होत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी या मार्गास विरोध केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील गावांमधून लढा तीव्र होत असून शेतकरी संघटित झाला आहे.



राज्यातील १३ जिल्ह्यातून शक्तीपीठ महामार्गास तीव्र विरोध होत आहे. सर्वच भागातून शक्तिपीठ महामार्गास कडाडून विरोध होत असून रास्ता रोको, मोर्चे, उपोषणे, धरणे आंदोलन यासारखी आंदोलने करून शेतकऱ्यांनी आंदोलनाची धग कायम ठेवली आहे.

दरम्यान, शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापुरात सर्वपक्षीय मेळाव्याची हाक देण्यात आली आहे. कोल्हापुरातील कसबा बावड्यात श्रीराम सोसायटीत सकाळी ११ वाजता हा मेळावा होणार आहे. शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीने या मेळाव्याची हाक दिली आहे. बाधित तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलं आहे.

# जागतिक आरोग्य संघटनेने जगभर जाहीर केला ईबोला अलर्ट

कॉंगो : डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ कॉंगो आणि युगांडामध्ये इबोला विषाणूने धुमाकूळ घातला आहे. आतापर्यंत ईबोला विषाणूमुळे ८८ मृत्यू झाले आहेत. धोकादायक इबोला विषाणूची बाधा झालेले नवे ३०० पेक्षा जास्त रुग्ण आढळले आहेत. परिस्थितीचा अंदाज घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने जगभर ईबोला अलर्ट जाहीर केला आहे. इबोला ही एक आंतरराष्ट्रीय आरोग्य आणीबाणी असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले.

जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधानोम गेब्रेयसस यांनी रविवार १७ मे २०२६ रोजी कॉंगो आणि युगांडामधील इबोलाचा प्रादुर्भाव 'जागतिक सार्वजनिक आरोग्य आणीबाणी' म्हणून घोषित केला. बुंदीबुग्यो विषाणूमुळे होणारा उद्रेक म्हणजे कोविड-१९ प्रमाणे जागतिक महामारी नाही. पण खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले. एवढ्यात कोणत्याही देशाने इतरांसाठी आपल्या आंतरराष्ट्रीय सीमा बंद करण्यासारखी परिस्थिती झालेली नाही. पण खबरदारी घेतली पाहिजे, असे जागतिक आरोग्य संघटनेकडून सांगण्यात आले. इबोला संकटाची नेमकी आकडेवारी पुढील काही दिवसांत स्पष्ट होईल. या आकडेवारीवरून संकटाची तीव्रता समजेल. पण वेळीच खबरदारी घेतल्याचे परिस्थिती हाताबाहेर जाणार नाही; असा विश्वास जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केला आहे. इबोला झालेल्या रुग्णाच्या लाळ, उलटी, रक्त किंवा वीर्याच्या संपर्कात आल्यामुळे इतरांना हा आजार होण्याचा धोका वाढतो. हा आजार गंभीर आणि अनेकदा प्राणघातक असतो. सध्याचा उद्रेक हा इबोलाचा एक दुर्मिळ प्रकार असलेल्या बुंदीबुग्यो विषाणूमुळे झाला आहे . सध्या यावर उपचार करण्यासाठी कोणतेही औषध किंवा लस उपलब्ध नाही. कॉंगो आणि युगांडाने इबोलाच्या २० हून अधिक लाटा (वेव्हज) अनुभवल्या आहेत. बुंदीबुग्यो विषाणूचा हा कॉंगो आणि युगांडातील तिसरा उद्रेक आहे. आतापर्यंत युगांडात दोन आणि इतर सर्व प्रकरणे कांगोत आढळली असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने सांगितले.



संघर्षाच्या आगीतून हा हिरा पैलूदार झाला
जनसेवेचा वसा घेऊनी 'यशसिद्धि'चा सूर्य उगवला
नाव गाजतंय नभी, कर्तृत्व त्याचं लय भारी
कमलाकर सोनकांबळे नाव गाजतंय घरोघरी!
कमलाकर सोनकांबळे नाव गाजतंय घरोघरी!

गोगावच्या मातीत जन्मले, आई राजवा-वडील ज्ञानदेव
बापाच्या भजनाचा वारसा, अन् कष्टाचा हा देव
वडील गवंडी कामातून, मुलांना शिकवत गेले
संस्काराचे बाळकडू ते रक्तात भिनायले
शाळेत असतानाच ज्यांना, समाजसेवेची गोडी
कमलाकर सोनकांबळे यांची, जिद्द कुणी ना तोडी!
जिद्द कुणी ना तोडी!

'संचार' अन् 'लोकमत'ने दिली, लेखणीला धार
शून्यातून विश्व निर्माण केले, सोसून संकटाचे वार
'सत्यप्रिय' अन् 'कालिगंगा'त, मांडले जनतेचे प्रश्न
'दैनिक यशसिद्धि'ने आता, जागवले जनमन
भीम-कोरेगावच्या ध्येयाचे, ब्रीद ज्यांच्या ओठी
कमलाकर सोनकांबळे धावले, दीन-दलितांच्या साठी!
धावले जनसेवेसाठी!

उपसरपंच होऊनी गावी, विकासाची गंगा आणली
अडकलेल्या त्या गरिबांची, घरकुलं त्यांनी बांधली
'लाडकी बहीण' योजना असो वा, 'संजय गांधी' निराधार
आरोग्य शिबिरांनी दिला, रुग्णांना मोठा आधार
कोरोनाच्या काळात ज्यांनी, जीव धोक्यात घातला
कमलाकर सोनकांबळे यांनी, माणुसकीचा धर्म पाळला!
माणुसकीचा धर्म पाळला!

संविधानाची मूल्ये मांडती, धम्म क्रांतीची वाट
आंबेडकरी विचारांचा, काळजावर त्यांच्या थाट
शेतकरी, कष्टकरी, महिलांचे, ते झाले आधारस्तंभ
'सिद्धार्थ फाउंडेशन'च्या कार्यातून, उभा केला हा खांब
आज वाढदिवस त्यांचा, शुभेच्छांचा वर्षाव हा झाला
कमलाकर सोनकांबळे यांच्या, कार्याचा डंका वाजला!
कार्याचा डंका वाजला!

शंभर वर्ष आयुष्य लाभो, हीच देवाचरणी आस
लोकशाहीचा हा बुलंद आवाज, 'यशसिद्धि'चा ध्यास
कमलाकर सोनकांबळे, नाव गाजतंय घरोघरी!
कमलाकर सोनकांबळे, नाव गाजतंय घरोघरी!

**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा, संपादक कमलाकर सोनकांबळे साहेब!**

– अक्षांता महादेव वाघमारे (मुंबई)

# मागासवर्गातील उमेदवारास खुल्या वर्गात स्पर्धा करण्यास मनाई करणारा मंत्रिमंडळाचा निर्णय रद्द करावा..

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने नुकत्याच झालेल्या बैठकीत असा निर्णय घेतला आहे की ' जे मागासवर्गीय उमेदवार परीक्षेस बसताना वय , अनुभव , पात्रता इत्यादी बाबत सवलत घेतील त्यांना कितीही गुण मिळालेत तरी त्यांना खुल्या गटात निवडले जाणार नाही.'

फडणवीस सरकारचा हा निर्णय त्यांच्या पेशवाई / ब्राह्मणी विचारांना व कारस्थानला धरूनच आहे. मागासवर्गाच्या विरोधात सतत काही तरी षडयंत्र रचून त्यांना विविध टप्प्यांवर अडविण्याचे धोरण राबवले जात आहे. याआधी ५ मे २०२६ रोजी च्या जीआर मध्ये त्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिष्ठाता , संचालक ह्यासारख्या पदांची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून करणे रद्द केले व त्याद्वारे त्या भरती मधील आरक्षण खतम केले आहे. एकीकडे पदोन्नती मधील आरक्षण २०१७ पासून बंद तर दुसरीकडे आता लोकसेवा आयोगाच्या मार्फत भरती बंद करून तेथील ह्या शेकडो पदांसाठीचे आरक्षण देखील बंद असे मागासवर्गीय विरोधी कारस्थान फडणवीस सरकारने सुरू केले आहे.

हे हाणून पाडले पाहिजे एकजुटीने.

आताचा मंत्रिमंडळाचा निर्णय मुळात संविधानातील समतेच्या तत्वाच्या विरोधात आहे.

परीक्षेत खुल्या प्रवर्गा एवढे गुण मिळाले असल्यास त्या उमेदवाराची खुल्या वर्गातच निवड होणे न्यायाला धरून आहे. त्या उमेदवाराने वय , पात्रता , अनुभव ह्यामध्ये सवलत घेतली असली तरी ती सवलत त्या उमेदवारास केवळ लेव्हल प्लेइंग फील्ड देते , गुण देत नाही.

सर्वोच्च न्यायालयाने देखील छाया आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य ह्या प्रकरणातील २३ मार्च २०२६ रोजी दिलेल्या निकालात हीच वस्तुस्थिती अधोरेखित केली आहे.

न्यायालय स्पष्टपणे म्हणते की मागासवर्गीय म्हणून मिळालेली सवलत मिळाल्या नंतर तो उमेदवार संबंधित परीक्षेस बसतो व तिथून पुढे तो इतरांच्या प्रमाणेच उत्तीर्ण होतो व स्पर्धेत सहभागी होतो. त्यामुळे परीक्षेत त्याला मिळालेले गुण हेच महत्वाचे ठरतात व त्याला खुल्या गटा एवढे गुण मिळाले तर त्याला खुल्या गटातच निवडले गेले पाहिजे.

यापुढे न्यायालय म्हणते की ,

आरक्षित प्रवर्गातील ज्या उमेदवाराने पात्रता परीक्षेमध्ये सवलत/शिथिलता घेतलेली आहे, अशा उमेदवाराचे खुल्या प्रवर्गात स्थलांतर (migration) होणे हे भरती नियमांवर किंवा रोजगार जाहिरातीवर अवलंबून असते. जर संबंधित भरती नियम किंवा रोजगार जाहिरात अशा स्थलांतरास परवानगी देत असेल, तर ते मान्य राहील.

तसेच, जर भरती नियम किंवा रोजगार जाहिरात याबाबत मौन बाळगत असतील किंवा अशा स्थलांतरास स्पष्टपणे मनाई करत नसतील, तरीही असे स्थलांतर मान्य राहील..

ह्या निकालाचा थोडक्यात अर्थ असा की मागासवर्गीय उमेदवाराने जरी काही सवलत घेतली असली आणि त्याला खुल्या वर्गा प्रमाणे गुण मिळाले तर त्याला खुल्या गटात निवडावे.

जर असे करण्यास प्रतिबंध करणारा नियम अस्तित्वात नसेल तर खुल्या वर्गात मागासवर्गीय उमेदवार निवडला जाऊ शकतो.

अर्थात जर शासनाने ह्यास प्रतिबंधक करणारा नियम केला तर शासनाचे ते धोरण सुरू राहील.

म्हणजेच मागासवर्गीय उमेदवाराने विशेष सवलती घेतल्या तरी त्याला खुल्या गटात स्पर्धा करता येऊ शकते हे धोरण सुरू ठेवण्याचे संपूर्ण अधिकार राज्य सरकारला आहेत.

परंतु आता सरकार त्याउलट निर्णय घेऊन मागासवर्गीय उमेदवाराने खुल्या गटात स्पर्धा करण्या पासून रोखत आहे.

मुळात खूला गट याचा अर्थ सर्वांसाठी खूला असणारा गट असतो , त्यात जास्त गुण मिळवणारा कुणीही दाखल होऊ शकतो. खूला गट सवर्णांसाठी राखीव गट नाही हे लक्षात घ्यायला हवे.

सरकार मात्र खुल्या गटाला सवर्णांसाठी राखीव गट बनवू पाहत आहे असे दिसते.

ह्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय रद्द झाला पाहिजे व तसा जीआर निघणार नाही यासाठी संघर्ष केला पाहिजे.

शासन आपल्या प्रतिरोधाची चाचपणी देखील करीत आहे.. आपण हे सहन केले तर सरकार आणखीन पुढे जाऊन आपल्याला चेपणार आहे.

त्यामुळे सरकारला वेळीच रोखले पाहिजे.

आपल्या एससी एसटी ओबीसी लोकप्रतिनिधीनां याबाबत जागरूक करून त्यांना ह्याविषयावर भूमिका घ्यायला भाग पाडले पाहिजे. त्यासाठी सर्वजन मिळून प्रयत्न करूयात.

जय भीम , जय बिरसा , जय शिवराय.

**– डॉ. संजय दाभाडे , पुणे**
९८२३५२९५०५
sanjayaadimgmail.com

## अन्यथा तिव्र अंदोलन छेडण्यास भाग पाडु नका :- जितेंद्र कानडे

# नळदूर्ग शहरातून सोलापूर कडे जाणारा जुना राष्ट्रीय महामार्ग चालू करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहरातील जुना राष्ट्रीय महामार्ग त्वरित चालू न झाल्यास या पेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे उपजिल्हाप्रमुख,जिल्हा परिषद सदस्य डॉ जितेंद्र कानडे यांनी नळदुर्ग येथील रास्ता रोको आंदोलन प्रसंगी दिला

नळदुर्ग शहरातून गेलेला राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळण रस्ता केल्यामुळे मुर्टा पाटी ते खंडोबा पणन येथून बंद करण्यात आला आहे. तो रस्ता त्वरित चालू करण्यासाठी महाविकास आघाडी कडून आज रविवार दिनांक १७/ ०५ / २०२६ रोजी सकाळी दहा वाजता नळदुर्ग बस स्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर एक तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले.





यावेळी बोलताना डॉ जितेंद्र कानडे म्हणाले की नळदुर्ग शहर हे ऐतिहासिक व पर्यटन शहर म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच श्रीखंडोबाचे तीर्थक्षेत्र ही आहे. या ठिकाणी अनेक भाविक व पर्यटक दररोज मोठ्या संख्येने येतात परंतु भारतीय जनता पार्टीच्या सरकारने या शहराचे महत्त्व कमी करण्यासाठी शहरातून गेलेला जुना राष्ट्रीय महामार्ग मुर्टापाटी व खंडोबा पण येथून बंद करून शहराचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न चालवला आहे, यामुळे पर्यटनावर परिणाम झालाच आहे,उलट शहरातील व्यापार ही बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने नागरिकांना याचा त्रास होत आहे. गोलाई येथून उड्डाणपुला खालून वळण घेत असताना जड वाहनांचा अपघात होत आहे. तसेच नवीन केलेल्या बाह्य वळण रस्त्यावरही मोठे खड्डे पडले असल्याने वाहन चालवताना त्रास होत आहे, अणदुर नळदुर्ग ला जोडणारा पणन जवळील रस्ता महत्वाचा आहे.यामुळे जुना राष्ट्रीय महामार्ग चालू होणे गरजेचे आहे,तो जर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने त्वरित चालू न केल्यास यापेक्षाही आणखी तीव्र आंदोलन महाविकास आघाडी कडुन केले जाईल याची दखल घ्यावी, असे ते म्हणाले,

याच रास्ता रोको आंदोलनावेळी बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पनेतेक्षाचे नेते प्रशांत नवगिरे म्हणाले की राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जनतेच्या सहनश्रेष्ठीचा अंत पाहू नये,जर हा महामार्ग त्वरित चालू न झाल्यास शिवसेना त्यास आक्रमकपणे उत्तर देईल व संबधीत अधिकाऱ्यांचे प्रसंगी कपडेही फाडू असे म्हणाले,नळदुर्ग शहरातून गेलेला जुना रस्ता हा पुन्हा पूर्व चालू करावा यामुळे नागरिकांचे व्यापाऱ्यांचे वैयक्तिक शहराचे नुकसान होत आहे, तो आम्ही खपवून घेणार नाही. असाही इशारा त्यांनी दिला,

यावेळी शेतकरी संघटनेचे प्रदीप जोशी, नगरसेवक मारुती खारवे, नगरसेवक व ईमाम शेख, संतोष पुदाले, यांनीही मार्गदर्शन केले,

रास्तारोको वेळी जळकोट अणदुर व अक्कलकोट कडे जाणाऱ्या वाहनांची मोठी कोंडी झाली होती. मागन्याचे निवेदन नळदुर्ग पोलिस ठान्याचे पोलिस निरीक्षक यांना देन्यात आले. रास्ता रोकोस धाराशिव जिल्हा उ. बा.ठा शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा जिल्हा परिषद सदस्य डॉक्टर जितेंद्र कानडे,धाराशिव जिल्हा शिवसेना उबाठा नेते प्रशांत नवगिरे,शिवसेना तुळजापूर तालुका शेतकरी सेना प्रमुख बाळकृष्ण घोडके,कृष्णात मोरे,अनिल छत्रे, नळदुर्ग शहर उ बा ठा शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, सरदार सिंग ठाकूर,भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक मारुती खारवे, नगरसेवक इमाम शेख, नगरसेवक सुधीर पोतदार, नगरसेवक आकाश कुलकर्णी,नसीर इनामदार,फारुख कुरेशी, शेतकरी संघटनेचे दिलीप जोशी,शिवसेनेचे राजेंद्र जाधव,दत्ता भोसले, कल्याण करपे, बालाजी गायकवाड, अमित शेंडगे,श्याम कनकधर, ओंकार कलशेट्टी, सोमनाथ म्हेत्रे व सज्जाद मोजन, अहमद इनामदार, समीर शेख, साजिद काजी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सरकारी डोंगर खाजगीच्या घशात?

## विष्णूनगरमध्ये महसूल प्रशासनावर संगनमताचे आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विष्णूनगर येथील गट नंबर १०६ हा मागील तब्बल ५० वर्षांपासून सरकारी नावावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असताना अचानक संबंधित गट खाजगी नावावर झाल्याचे समोर आल्याने गावात संतापाचा भडका उडाला आहे. या प्रकारामुळे महसूल विभागातील काही अधिकारी आणि भूमाफियांच्या संगनमताचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित डोंगर परिसरात मुरूम काढण्यासाठी मोजणी सुरू असून घटनास्थळी मोठी मशीनही दाखल झाली आहे. त्यामुळे डोंगर पोखरून मोठ्या प्रमाणात मुरूम उपसण्याची तयारी सुरू असल्याचा आरोप होत आहे. मंदिर, गावचे तळे आणि हजारो झाडांनी समृद्ध असलेल्या डोंगरावर आता भूमाफियांची नजर पडल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत.

प्रकरणाची माहिती मिळताच गावात तातडीची ग्रामसभा घेण्यात आली. त्यानंतर शेकडोच्या संख्येने ग्रामस्थ थेट डोंगरावर दाखल झाले. डोंगर वाचवा, भूमाफिया हद्दपार करा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. परिस्थिती चिघळल्याने पोलिस प्रशासनालाही घटनास्थळी धाव घ्यावी लागली.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, काही महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमतातून सरकारी गट खाजगी नावावर करण्यात आला आणि त्यानंतर डोंगरावरील नैसर्गिक संपत्ती संपवण्याचा डाव सुरू झाला. ५० वर्षे सरकार नावावर असलेली जमीन अचानक एका प्रक्रियेत खाजगी कशी झाली? असा थेट सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान, महसूल विभागाकडून थकीत कर भरल्यानंतर नाव नोंद झाले असे स्पष्टीकरण दिले जात असले तरी ग्रामस्थांनी हे कारण फेटाळून लावले आहे. जर कर भरल्यावर सरकारी जमीन खाजगी होत असेल, तर उद्या कुणीही सरकारी जमीन आपल्या नावावर करू शकतो का? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, उताऱ्यावर नाव लागल्यानंतर लगेच मोजणी, मशीन आणि मुरूम उपसण्याची तयारी सुरू झाल्याने संपूर्ण प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

या विरोधात डोंगर बचाव समिती स्थापन करण्यात आली असून गावकरी पूर्णपणे आक्रमक झाले आहेत.




**उताऱ्यावर नाव लावण्याचे आदेश दिले असतील, पण हजारो झाडे तोडण्याचे, डोंगर पोखरून मुरूम विकण्याचे, मंदिर आणि गावचे तळे संपवण्याचे अधिकार प्रशासनाला कोणी दिले? महसूल विभागाने जनतेला मूर्ख समजू नये. ५० वर्षांपासून सरकारी असलेली जमीन अचानक खाजगी होते आणि त्यानंतर लगेच मशीन घेऊन भूमाफिया डोंगरावर पोहोचतात, हा योगायोग नाही तर संगनमताचा संशय निर्माण करणारा प्रकार आहे,**

**– एकनाथ जेऊघाले**

**गावचा डोंगर, हजारो झाडे, मंदिर आणि तळे वाचवण्यासाठी आम्ही कोणत्याही थराला जाऊ. कुठल्याही परिस्थितीत डोंगरावरील मुरूम काढू देणार नाही. प्रशासनाने आणि भूमाफियांनी जबरदस्तीने काम सुरू करण्याचा प्रयत्न केला, तर संपूर्ण गाव एकवटून उभं राहील,**

**– आनंदा मवाळ**

**५० वर्षांपासून सरकारी असलेला डोंगर अचानक खाजगी नावावर कसा गेला?**

**जनतेचा आवाज दाबला जाणार की भूमाफियांच्या मनमानीला कायद्याचा कडक धडा मिळणार?**

**हजारो झाडे, मंदिर आणि गावचे तळे वाचणार की मुरूम माफियांच्या मशीनखाली गाडले जाणार?**

**प्रशासन वेळेत जागं होणार की हा डोंगरही हरवलेली सरकारी संपत्ती म्हणून इतिहासात नोंदवला जाणार?**

**सदर मिळकत ही खाजगी वंशपरंपरागत पोतनीस यांच्या मालकीची आहे. केवळ जमीन पडीत असल्याने आकारी पड लागलेली होती वारस नोंद विधीपूर्वक मंजूर आहे. ७/१२ उताऱ्यातील सरकार नोंद ही केवळ लेखन प्रमाद चूक होती त्यामुळे सदर मिळकतीवर दाखल असलेले सरकारचे नाव हे केवळ ७/१२ पुनर्लेखनातील त्रुटीमुळे आलेले असून, त्यास कोणताही कायदेशीर आधार नाही. त्यामुळे फेरफार नोंद क्र. २४१९ प्रमाणे वारस नोंद अंमलात आलेली आहे.**

**– तहसीलदार विशाल नाईकवाडे निफाड**

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील दर्शन पूर्णत: निशुल्क पैशांची मागणी करणाऱ्यांपासून सावध राहण्याचे मंदिर समितीचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणारे मुखदर्शन व पदस्पर्श दर्शन हे मंदिर समितीमार्फत पूर्णतः निशुल्क स्वरूपात दिले जाते. दर्शनासाठी कोणत्याही प्रकारची फी, देणगी अथवा रक्कम आकारली जात नाही.

अलीकडे समाज माध्यमांवर एक ऑडिओ क्लिप मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत असून, त्यामध्ये अज्ञात व्यक्तींमार्फत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील दर्शनासाठी पास उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली भाविकांकडून पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित व्यक्तीकडून मोबाईल क्रमांकाद्वारे डिजिटल पद्धतीने रक्कम स्वीकारण्यात आल्याची बाबही समोर येत आहे.

### वायरल ऑडिओ क्लिप च्या संदर्भात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू

सदर प्रकार हा भाविकांची आर्थिक फसवणूक करणारा असून मंदिर समितीची बदनामी करण्याचाही प्रयत्न असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी मंदिर समितीच्या वतीने पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर भारतीय न्याय संहिता व माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने सर्व भाविकांना आवाहन करण्यात येते की,

श्री विठ्ठल व श्री रुक्मिणी मातेचे दर्शन संपूर्णतः निशुल्क असून दर्शनासाठी कोणत्याही व्यक्तीस पैसे देऊ नयेत. कोणीही व्यक्ती दर्शनासाठी पैसे, पास किंवा विशेष सुविधा देण्याच्या नावाखाली मागणी करत असल्यास तत्काळ मंदिर समिती कार्यालयकडे तक्रार नोंदवावी असे आवाहन व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी केले.

## अधिकमास निमित्ताने कादवा कारखाना येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कादवा सहकारी साखर कारखाना येथील कादवा इंग्लिश मीडियम राजाराम नगर येथे बाल संस्कार शिबिर व अधिकमासाच्या पर्व कालावर पाच दिवसाच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार यांच्या कीर्तन सेवा संपन्न होणार आहे तरी भाविकांनी या कीर्तन सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक ह भ प अभिजीत महाराज देशमुख राजापूरकर यांनी केले आहे.

कादवा कारखाना इंग्लिश मीडियम स्कूल व ज्ञानविश्व बहुउद्देशीय संस्था, संत पाटील बाबा ज्ञानदान वारकरी शिक्षण संस्था, आणि प.पू. परमहंस शिवदास महाराज वारकरी गुरुकुल संस्था करंजी यांच्या संयुक्त विद्यमानाने बाल संस्कार शिबिर दिनांक ५ मे ते २५ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे.

या संस्कार शिबिराचे उद्घाटन बाळासाहेब पंढरीनाथ उगले यांच्या हस्ते संपन्न झाले.

दररोज विद्यार्थ्यांना व्यायाम, वारकरी परंपरेतील शिक्षण, वाद्य वादन, राष्ट्रपुरुष यांच्या प्रेरणादायी कथा, , हरिपाठ इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या बाल संस्कार शिबिराची सांगता व अधिक मास या पर्वकाळावर दिनांक २१ मे पासून पाच दिवसांचा कीर्तन सोहळा आयोजित केलेला आहे

या कीर्तन सोहळ्यात गुरुवार दिनांक २१ मे रोजी ह भ प योगेश महाराज शिंदे, शुक्रवार दिनांक २२ मे रोजी ह भ प समाधान महाराज पगार शनिवार दिनांक

२३ मे रोजी ह भ प माधव महाराज काजळे रविवार दिनांक २४ मे रोजी हभप. श्याम कुमार महाराज पांचाळ या कीर्तनकारांची यांची रात्री आठ ते दहा या वेळेत कीर्तन होईल तर सोमवार दिनांक २५ मे रोजी सकाळी नऊ ते ११ या वेळात आळंदी येथील जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यापक ह भ प उत्तम महाराज सूर्यवंशी यांचे काल्याचे किर्तन होऊन बाल संस्कार शिबिराची सांगता होणार आहे या कार्यक्रमासाठी नाशिक जिल्ह्यातील वारकरी संप्रदायातील सर्व वारकरी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन नियोजन समितीचे वतीने आयोजक ह भ प अभिजीत महाराज देशमुख राजापूरकर यांनी केले आहे. अनेक दानशूरांनी, अनमोल सहकार्य लाभले आहे..

## टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी आज माण नदीत दाखल होणार; आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश : शेतकऱ्यांना मोठा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**







सांगोला : टेंभू प्रकल्पाच्या पाण्याचे सांगोल्यासाठी आवर्तन सुरू करण्यात आले असून, टेंभूच्या पाण्याने आटपाडी तलाव भरल्यानंतर आता माण नदीत ते पाणी सोडले आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात दुष्काळी परिस्थितीत सांगोल्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.सांगोला तालुक्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, जनतेला दिलासा देण्यासाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू योजनेतून आवर्तन सुरू होण्यासाठी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

टेंभू उपसा सिंचन योजनेतून सोडण्यात आलेले पाणी आज संध्याकाळपर्यंत माण नदीपात्रात पोहोचणार असल्याने सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन टेंभू योजनेतून माण नदीला उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडावे अशीमागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी २८ एप्रिल रोजी लेखी पत्र देऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. तसेच सांगोल्यात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू योजनेतून लाभक्षेत्रातील जुनोनी, हातीद, पाचेगांव जुजारपूर, हटकर मंगेवाडी, राजुरी या गावातील तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरून टेंभूचे माण नदीमध्ये पाणी सोडून खवासपूर ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे भरण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश आल्याने अखेर टेंभू योजनेचे पाणी माण नदीत दाखल होत असून, याचा लाभ तालुक्यातील शेतकरी, पशुपालक तसेच नागरिकांना होणार आहे. नदीपात्रातील पाण्यामुळे विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीतही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कोणत्याही गावाला पाणी कमी पडू नये, याची दक्षता घेण्याच्याही सूचना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ऐन उन्हाळ्यात टेंभूचे पाणी मिळाल्याने पिण्याचा पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने माणनदी नदीकाठावरील सर्व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी माण नदीत सोडण्याची मागणी मान्य केल्याबद्दल जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील त्याचबरोबर ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आभार मानले.

### तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी हल्ले : सामान्य नागरिकांनी काय करावे ?

### नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

# तेंदूपत्ता संकलनास गेलेल्या मजुरावर रानटी जनावरांचा हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :

तालुक्यातील तीरखुरी सहवन क्षेत्र भाग:१ नियत क्षेत्र :३अंतर्गत येणाऱ्या जंगल परिसरात तेंदुपत्ता संकलन करीत असलेल्या एका मजुरावर अस्वलाने अचानक हल्ला करून जखमी केल्याची दुर्दैवी घटना सकाळी आठच्या सुमारास समोर आली आहे. जखमी इसमाचे नाव दीपक रतिराम गावळे (वय ४०) असून तो आपल्या कुटुंबासह जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलन करण्यासाठी गेला होता.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जखमी मजुरावर सद्या केशोरी आरोग्य केंद्रात उपचार सुरू आहेत.



प्राप्त माहितीनुसार भरनोली परिसरातील काही मजूर सकाळच्या सुमारास जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेले होते.दरम्यान दाट जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलनाचे काम सुरू असताना अचानक अस्वलाने हल्ला चढविला. अस्वलाने त्याच्या मांडीवर गंभीर जखमा केल्याचे सांगण्यात येते.घटनेनंतर सोबत असलेल्या सहकाऱ्यांनी आरडाओरड केल्याने अस्वल जंगलाच्या दिशेने पळून गेले. जखमी मजुराला जंगलाबाहेर काढून तात्काळ केशोरी आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेण्यात आले आहे.




दरम्यान वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट दिल्याचे सांगण्यात येते. गोठणगाव वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे सांगण्यात आले आहे

**तीन अस्वलांचा जीवघेणा हल्ला**

जवळील परिसरात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, मौजा बाक्टी येथे पुन्हा एकदा अस्वलांच्या हल्ल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तेंदूपत्ता संकलनासाठी जंगलात गेलेल्या एका महिलेवर तब्बल तीन अस्वलांनी जीवघेणा हल्ला चढविल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या अर्जुनी मोरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव रेखा दिलीप भोयर (वय ४० वर्षे), रा. बाक्टी ता. अर्जुनी मोरगाव जि. गोंदिया असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रेखा भोयर या आज पहाटे गावातील इतर महिलांसोबत नेहमीप्रमाणे घाटराई जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलनासाठी गेल्या होत्या. जंगलात तेंदूपत्ता गोळा करत असताना अचानक दबा धरून बसलेल्या तीन अस्वलांचा त्यांच्यासमोर सामना झाला.

अस्वलांना पाहताच त्यांनी जीव वाचवण्यासाठी पळण्याचा प्रयत्न केला. तसेच स्वतःचा बचाव करण्यासाठी जवळील झाडावर चढण्याचाही प्रयत्न केला. मात्र, आक्रमक झालेल्या अस्वलांनी त्यांना झाडावरून खाली खेचत जोरदार हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला व शरीराच्या विविध भागांना गंभीर दुखापत झाली.

सोबत असलेल्या महिलांनी आरडाओरडा केल्यानंतर अस्वले जंगलाच्या दिशेने पसार झाली. त्यानंतर जखमी अवस्थेतील रेखा भोयर यांना तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना-बाक्टी येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय अर्जुनी मोरगाव येथे रेफर केले.

दरम्यान, अर्जुनी मोरगाव तालुक्यात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांची ही अल्पावधीत घडलेली चौथी घटना असल्याने ग्रामस्थांमध्ये भीती आणि संताप व्यक्त केला जात आहे. जंगल परिसरात तेंदूपत्ता संकलनासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना करून गस्त वाढवावी तसेच प्रभावित कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

तालुक्यातील वडेगाव बंध्या येथे तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या एका वृद्ध महिलेवर वाघाने झडप घालून ठार केल्याची दुर्दैवी घटना रविवारी (ता. १० मे) सकाळी उघडकीस आली. सलग दुसऱ्या दिवशी झालेल्या या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र दहशत पसरली आहे. मृत महिलेचे नाव कौशल्या हरिदास रहाटे (वय ६५, रा. वडेगाव बंध्या) असे आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील वनपरिक्षेत्र गोठणगाव अंतर्गत वनक्षेत्र केशोरी येथील नियतक्षेत्र वडेगाव बंध्या, कक्ष क्रमांक २८२ मध्ये त्या आपल्या सुनेसह तेंदूपत्ता संकलनासाठी गेल्या होत्या. यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक त्यांच्यावर झडप घातली. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

विशेष म्हणजे, बोंडगाव-सुरबन परिसरात कालच (ता. ९ मे) तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या एका महिलेवर वाघाने हल्ला करून तिला गंभीर जखमी केले होते. ती घटना ताजी असतानाच आज पुन्हा वाघाच्या हल्ल्यात एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याने संपूर्ण तालुक्यात भयाचे सावट पसरले आहे. परिसरात मागील काही दिवसांपासून वन्य प्राण्यांचा वावर वाढला असून, गावालगत येऊन कोंबड्या, शेळ्या तसेच लहान मुलांवरही हल्ल्याच्या घटना घडत आहेत. यापूर्वी एका चिमुकल्याचा जीवही वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात गेला होता. आता सलग दोन दिवस माणसांवर झालेल्या वाघाच्या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. मृत कौशल्या रहाटे या स्थानिक अंगणवाडी केंद्रात मदतनीस म्हणून कार्यरत होत्या. त्या नुकत्याच १ एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाल्या होत्या. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्या तेंदूपत्ता संकलनाचे काम करीत असताना ही दुर्दैवी घटना घडली. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.




# यश सिद्धी न्यूज वर्धापन दिन व संपादक कमलाकर सोनकांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त दोन शब्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सामाजिक कार्य करत असताना अनेक जातीवादी लोकांना संघर्ष करून सामाजिक न्याय देण्याचे प्रयत्न करत असतात अनेक संकटांना तोड देत एक वेगळी वलय निर्माण केलेल्या दैनिक यश सिद्धी न्यूजला वर्धापन दिनाच्या खूप खूप शुभेच्छा यासोबतच ज्यांनी शून्यातून वृत्तपत्र चालू करून ते अनेक अडचणीत देखील सुरुवात ठेवणारे भीमयुद्धा कमलाकर सोनकांबळे यांनाही वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा

वास्तविक पाहता या बद्दल गेल्या अनेक दिवसापासून लेखन करायचं म नात होत मात्र आज दिवस उजळला

ग्रामीण भागातील युवक अनेक अडचणीत असताना देखील अनेक संकटाचे संघर्ष करत बहुजन चळवळीचे मुखपत्र असलेले दैनिक यश सिद्धी न्यूज हे वृत्तपत्र मुंबई पुणे सोलापूर याठिकाणी गेली तीन वर्ष यशस्वीपणे चालू ठेवल्याबद्दल सिद्धार्थ सोशल फाउंडेशन अध्यक्ष तथा संपादक कमलाकर सोनकांबळे याचे अभिनंदन त्यांनी विविध क्षेत्रात काम करत असताना सम्यक बहुउद्देशीय सहकारी संस्थेचे चेअरमन, सम्यक उद्योग समूहाचे चेअरमन, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष, ज्या मालकीचे वृत्तपत्र चालवली जात आहे अशा सिद्धार्थ सोशल फाउंडेशन अध्यक्ष म्हणून ही ते काम पाहत आहेत सामाजिक उपक्रमासोबत आर्थिक उन्नती युवकांना कसे मिळेल यासाठी प्रयत्नशील असतात कोरोना काळात सोलापूर,अक्कलकोट व पुण्यासारख्या शहरात संस्थेच्या माध्यमातून मोफत अन्न दान व आरोग्य किट वाटप करण्यात आले आहे त्यासोबत कोरोणा विषय जनजागृती करण्यात आहे आहेत

सध्या शेतकरी, महिला, मजूर, कष्टकरी, विद्यार्थी, वृद्ध वा जेष्ठ नागरिकाचे विविध समस्याच्या निराकरण करण्याचे आणि मदत कार्य करत असतात गेल्यावर्षी अतिवृष्टी मुळे दिवाळी सणात १२५ वंचित घटकातील नागरिकांना सिद्धार्थ सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून सिद्धार्थ किट देऊन दिवाळी गोड केले यासह अनेक सामाजिक उपक्रम कायम राबविण्यात त्यांनी अग्रेसर असतात

दैनिकाचे काम करताना सर्वजातीधर्मातील लोकांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील असतात सामाजिक प्रश्न हल्ली अतिशय हळुवारपणे हाताळणे गरजेचे आहे. परखड चिकित्सा, रोखठोक टीका ... त्यांच्या दैनिक यशसिद्धि न्युजच्या माध्यमातून आधुनिक विचारांचा वेध घेण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. जनतेतला भ्रम आणि संभ्रम दूर करण्यासाठी त्यांचे लेखन उपयुक्त ठरले आहे. यातूनच मूक क्रांतीकडे चाललेल्या नव्या भारताची जडणघडण होण्यास त्यांचे योगदान पोषक ठरत आहे. यामुळे प्रसार माध्यमांची भूमिका मध्यवर्ती ठरली आहे. या पार्श्वभूमीवर कमलाकर सोनकांबळे यांचा सन्मान योग्य वाटतो.



या सर्व संघर्ष जीवन जगत असताना भावाच्या प्रेमाचे आशीर्वाद भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे व गुरुवर्य यांचा फक्त तू लढ समाजाच्या हितासाठी, गावाच्या विकासासाठी, देशाच्या प्रगतीसाठी हे वाक्य जगण्याला प्रेरणा देणारे असतात

लोकशाहीवादी मूल्यांची पेरणी करणारे कमलाकर सोनकांबळे हे आंबेडकर चळवळीतील दीर्घकाळ चालणारे एक मुखपत्र म्हणून आेळखले जाते त्या वर्तमानपत्राचे ते संपादक आहेत. सोलापूर जिल्ह्यातील व आसपासच्या विविध गावातील राजकीय भूमिका सामाजिक घडामोडी इत्यादी अनेक वर्ष ते वार्तांकन करत आहेत त्यांचे भिमा कोरेगावचे इतिहास सांगतो महार रेजिमेंट सैनिक यश सिद्धि ब्रीद वाक्य घेऊन जसा इतिहास घडवला तसा दैनिक यश सिद्धि न्यूज भविष्यात सामान्य बहुजन समाजाला न्याय देण्यासाठी लढा देईल अशी आशा व्यक्त करतो, सध्या वाचक, विद्यार्थी, अनेक अभ्यासक, महिला, कष्टकरी व अनेक स्तरातून त्याचे वाचन केले जाते. अल्पकाळातच ते एक लोकप्रिय दैनिक म्हणून पुढे आलेले आहे. या परिसरातील अनेक महत्त्वाच्या क्षेत्रावर त्यांनी वार्तांकन करून आपले स्थान मजबूत केले आहे. कमलाकर सोनकांबळे संपादक म्हणून आंबेडकर चळवळीतील संपूर्ण चळवळीचा रचनात्मक अभ्यास व त्याची मांडणी करताना दिसून येतात. प्रत्येक समाजाला त्याचा सन्मान, स्वाभिमान व स्वावलंबन आवश्यक असते. जगण्याचा हक्क मिळावा... यासाठी ते नेहमी अशा प्रश्नावर ठसठशीत प्रकाश टाकताना दिसून येतात. सोनकांबळे हे आंबेडकरवादी भूमिकेतून लेखन प्रदर्शित करत असतात. व्यक्ती स्वातंत्र्य, मानवी अधिकार, जगण्याचा हक्क, सन्मान हा प्रत्येक समाजातील घटकाला मिळाला पाहिजे. दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांना शिकण्याची व संघटन करण्याची प्रेरणा मिळायला हवी. यासाठी ते सतत समाजातील एकात्मता, समानता, बंधुभाव व सामाजिक न्याय या क्षेत्रावर त्यांनी सदैव लेखन करत असल्याचे दिसून येते. या पुढील काळात संविधान मूल्य मांडून त्यावर लोकांचे मत परिवर्तन करण्याची तळमळ त्यांच्यामध्ये आहे. बाबासाहेबांच्या संविधानवादी व धम्म प्रबोधन चळवळीतूनच प्रेरणा घेऊन तरुण पिढी नवभारताच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान कसे देता येईल याविषयी त्यांचं वार्तांकन व लेखन महत्त्वाचे, उपयुक्त व उदबोधक ठरले आहे. राजकीय सामाजिक आर्थिक धार्मिक सांस्कृतिक या क्षेत्रात एक वैचारिक क्रांती कशी घडून येईल ? माणसाला माणूस म्हणून कसे जगता येईल याकरता त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून संघर्ष संघर्षमय प्रवास अतिशय मनोरंजक व उद्बोधक आहे.

दैनिक यश सिद्धी न्यूजच्या वर्धापन दिनानिमित्त व संपादक,पत्रकार कमलाकर सोनकांबळे याना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा....!

**– अजित गायकवाड**
**आंबेडकरवादी चळवळीचे कार्यकर्ते व अभ्यासक पुणे**



**जनसेवेचाध्यास मनी, कार्याचा हा वसा**
**गोगांवच्या मातीवर उमटला प्रगतीचा ठसा!**
**कमलाकर सोनकांबळे नाव गाजतंय भारी,**
**वंचितांच्या कल्याणाची स्वप्नं होती साकार आता सारी!**

**उपसरपंच पदी राहून, गरिबांचे अश्रू पुसले,**
**'रमाई आवास' घरकुलांनी घराघरात दिवे लागले!**
**४६ घरकुलं मंजूर केली, घराला घरपण दिलं,**
**वंचित अन् मागासवर्गीयांचं आयुष्य सुखानं भरलं!**

**आंबेडकर नगरचा कायापालट, वस्तीत घडविले बदल,**
**विकासाच्या वाटेवरती टाकले खंबीर पाऊल!**
**अभ्यासिका अन् स्मारकाचे स्वप्न उराशी बाळगले,**
**ज्ञानाच्या या मंदिरासाठी हात कष्टाचे सरसावले!**

**साथ मिळे नेतृत्वाची, मार्ग यशाचा गवसला,**
**सचिन दादा कल्याणशेट्टींचा आशीर्वाद लाभला!**
**सागर दादा, प्रदीपजी, अन् वनिता ताईंच्या साथीने,**
**गोगांवचा विकास होतोय मोठ्या जिद्दीने अन् प्रितीने!**

**सिद्धार्थ सोशल फौंडेशनचा आधार हा मोठा,**
**कमलाकर दादांच्या कर्तृत्वाचा कधी न पडो तोटा!**
**ज्ञानदेव सुपुत्र हा, जनसेवेला वाहिलेला,**
**विकासाचा महामेरू हा गोगावात पाहिलेला!**

**अशा या युवा उपसरपंचाना**
**कमलाकर सोनकांबळे साहेबांना**
**वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा**

**– महादेव सोनकवडे**
**( व्याख्याता, निवेदक, कवी, लेखक) वागदरी ता अक्कलकोट**

## संघर्ष नायक युवा नेतृत्व कमलाकर सोनकांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे हे महाराष्ट्रातील एक सक्रिय पत्रकार, संपादक आणि सामाजिक भान जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. ते यश सिद्धी न्यूजश्च या वृत्तसंस्थेचे संपादक म्हणून कार्यरत आहेत.

समाजात पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ मानले जाते. समाजातील घडामोडी जनतेपर्यंत पोहोचवणे, अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि लोकमत घडवणे हे पत्रकारितेचे महत्त्वाचे कार्य आहे. अशा पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींमध्ये कमलाकर सोनकांबळे यांचे नाव उल्लेखनीय आहे.

कमलाकर सोनकांबळे हे यश सिद्धी न्यूज या वृत्तसंस्थेचे संपादक म्हणून कार्य करत आहेत. त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि ग्रामीण भागातील प्रश्न लोकांसमोर मांडण्याचे काम केले आहे. त्यांची पत्रकारिता ही सामान्य माणसाच्या समस्या आणि समाजहिताशी जोडलेली असल्याचे दिसून येते.

संपादक म्हणून त्यांनी वृत्तपत्र व डिजिटल माध्यमांच्या सहाय्याने अनेक सामाजिक विषयांवर जनजागृती केली आहे. ग्रामीण



भागातील शेतकरी, युवक, विद्यार्थी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांना त्यांनी प्राधान्य दिले आहे. त्यांच्या लेखनात सामाजिक जाणीव आणि लोकहिताची भावना दिसून येते.

कमलाकर सोनकांबळे हे केवळ पत्रकार नाहीत, तर सामाजिक कार्यातही सक्रिय असल्याचे आढळते. समाजातील विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग असतो. त्यामुळे ते समाजाशी घट्ट नाते जोडून कार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात.

आजच्या डिजिटल युगात सत्य आणि निष्पक्ष बातमी देणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत कमलाकर सोनकांबळे यांनी पत्रकारितेतील प्रामाणिकपणा जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुणांना पत्रकारितेची प्रेरणा मिळत आहे.



शेवटी असे म्हणता येईल की, कमलाकर सोनकांबळे हे पत्रकारिता आणि समाजसेवा या दोन्ही क्षेत्रांत कार्यरत असलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. समाजातील प्रश्नांना वाचा फोडून लोकजागृती करण्याचे त्यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.

**– दयानंद बनसोडे**
**लोहगाव पुणे**

## वाढदिवसाचे अभिष्टचिंतन.....!


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आपण अति परिश्रम घेऊन सामाजिक क्षेत्रात सम विचाराची*बी रूजवून समाज प्रबोधन करणारे क्षेत्रात उत्तुंग व उत्कृष्ट भरारी कौटुंबिक समतोल विचार व शैक्षणिक क्षत्रात मार्गक्रमण करणारा विशेष म्हणजे स्वतःचे स्वार्थ न ठेवणारा, संस्कृती जपणारे, तळागाळात पोहचणारे, सामान्यांसाठी झटणारे, जनतेची एकनिष्ट असणारे, जागेवर कुठलेही प्रश्न निकाली काढणारे, प्रशासनावर वचक असणारे, हाकेला धावून येणारे, व शब्दाला जागणारे,आई-वडिल भाऊ यानां पुज्य मानणारा व पारदर्शक व्यक्ती महत्व, प्रतेक ठीकाणी येऊन सुख दु:खात व संकटसमयी धावून मदतीला तत्पर हजर राहाणारा,घटना प्रसंगी काहीही विचार न करीता सहभागी होऊन त्याचे अडचणी सोडवून देणारा मान उंचावून समर्थपणे,शांत स्वभावान संगळ्यानां आपलेसे करणारा सच्चा मनाचा प्रामाणिकपणे कर्तव्य बजावून पुढे घेऊन जाणारा जाणता राजा आज आपले किती कौतुक करावे तेवढे कमीच अशा महान व्यक्तीचे आम्हास सार्थ अभिमान आहे आज वाढदिवस होत आहे हा आपल्या जीवनातील अनमोल व आनंदी क्षणी लोकप्रिय आमचे उपसरपंच व मार्गदर्शक श्री कमलाकर सोनकांबळे (गोगांव)



यानां वाढदिवसाच्या शुभेच्छा श्री परमेश्वर कृपेने आपणास उदंड दिर्घायुष्य लाभो हीच श्री परमेश्वर चरणी प्रार्थना.

**शुभेच्छुक:– श्री मलकप्पा सातप्पा पोमाजी व परिवार (भारत भुवन हॉटेल वागदरी)**



**शब्दांचा दीप हातामध्ये,**
**सत्याचा मार्ग डोळ्यांमध्ये।**
**जनतेच्या त्या वेदनांना,**
**स्वर दिला त्यांनी लेखांमध्ये।।**

**साधेपणाची ठेवण सुंदर,**
**मनामध्ये समाजाचा दरबार।**
**अन्यायाविरुद्ध उभे राहत,**
**पत्रकारितेचा केला सत्कार।।**

**ग्रामीणांच्या प्रश्नांना त्यांनी,**
**न्यायाचा दिला नवा श्वास।**
**शेतकरी, युवक, विद्यार्थ्यांना,**
**दिला आशेचा सुंदर प्रकाश।।**

**यश सिद्धीच्या माध्यमातून,**
**जागवली जनतेची जाणीव।**
**सत्य, प्रामाणिकता, नीतिमत्ता**
**हीच त्यांच्या कार्याची ओळख ठरावी।**

**कष्ट, ध्येय आणि सेवाभाव,**
**यांनी सजले त्यांचे जीवन।**
**समाजहितासाठी झटणारा,**
**हा संपादक खरा प्रेरणास्थान।।**

**लेखनातून चेतना जागी,**
**मनामध्ये मानवतेचा सूर।**
**कमलाकर सोनकांबळे यांचे कार्य,**
**समाजासाठी सदैव भरपूर।।**

**त्यांच्या कार्याचा सुगंध राहो,**
**प्रेरणा मिळो नव्या पिढीला।**
**सत्यासाठी लढण्याची ताकद,**
**मिळो प्रत्येक पत्रकाराला।।**
**– कवी**
**प्रा राहुल रूही**
**भीमनगर अक्कलकोट जिल्हा सोलापूर**